# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ८८-२२** **दिनांक - १७/०३/२०२२**

## सुपारी घेऊन खुनाचा प्रयत्न करणा-या आरोपीतांना पकडण्यात गुन्हे शाखेला यश.

दिनांक २८/०२/२०२२ रोजी १७-३० वा.चे सुमारास बरफपाडा येथे दिपक शेठ यांचे घरा शेजारील ट्रान्सफार्मर जवळ विरार पुर्व ता. वसई येथे इसम नामे - आसाराम सदाशिव राठोड वय ४५ वर्षे हे जात असतांना दोन अज्ञात मोटारसायकल स्वार आरोपीत यांनी त्यांचेवर अग्निशस्त्रातुन गोळीबार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांचा मुलगा फिर्यादी नामे - आकाश आसाराम राठोड यांनी विरार पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २४१/२०२२ भा.द.वि.स कलम ३०७, ३४ भा.ह.का क ३, २५, २७ प्रमाणे. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची गांभीर्याने दखल घेवुन गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणे बाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी सदर गुन्हयाच्या समांतर तपासा दरम्यान आरोपीतांबाबत तांत्रीक विश्लेषणाव्दारे व गोपणीय बातमीदारांचे मार्फतीने माहिती मिळवुन आरोपी नामे- १) बबन गोवर्धन चव्हाण वय ५२ वर्षे, रा. चंदनसार रोड, विरार पुर्व. २) बाबासाहेब गिरीधारी राठोड वय ४० वर्षे, रा. चंदनसार रोड, विरार पुर्व. ३) अमित बिशेश्वर ठाकुर वय ३० वर्षे, रा. चंदनसार रोड, पेट्रोल पंप जवळ, विरार पुर्व. व गोळीबार करणारा आरोपीत नामे - ४) दिनेश रामजित यादव वय २८ वर्षे, रा. अहारौली, ठाणा- बरदाह, जि. आझमगड, राज्य उत्तर प्रदेश व ५) रमेश चव्हाण रा. जिंतूर जि. परभणी यांना अटक करण्यात आली असून त्यांना मा. न्यायालयाने दि १९/०३/२०२२ रोजी पावेतो तपासकामी पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे.

गुन्हयातील फिर्यादी यांनी रमेश चव्हाण रा. ता. जिंतूर जि.परभणी यांच्या मुलीशी केलेल्या प्रेम विवाहाच्या रागातुन रमेश चव्हाण याने फिर्यादी यांचे वडील आसाराम सदाशिव राठोड यांना ठार मारण्याच्या उद्देशाने आरोपी नामे- बबन गोवर्धन चव्हाण, बाबासाहेब गिरीधारी राठोड यांचे मार्फतीने आरोपीत नामे- अमित बिशेश्वर ठाकुर यास ५ लाख रुपयात सुपारी दिली होती. त्यानुसार आरोपी अमित ठाकुर याने उत्तरप्रदेश येथुन आरोपी दिनेश रामजित यादव व इतर एक यास बोलावुन इसम नामे आसाराम सदाशिव राठोड यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने अग्निशस्त्रातुन गोळीबार करुन हत्येचा प्रयत्न केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच उक्त आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता त्यांचा विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८२२/२०२० भा.दं.वि.कलम-३०७, ३४ सह आर्म ॲक्ट कलम-३, २५, २७ प्रमाणे गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. गुन्हयातील अटक आरोपीत दिनेश रामजित यादव यास लखनै एस.टी.एफ. उत्तरप्रदेश यांचे मदतीने पकडयात आले आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, सपोनि/ रजितसिंग परदेशी, सपोनि/ नितीन बेंद्रे, सपोनि/ कैलास टोकले, सपोनि/ दत्तात्रेय सरक, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, सफौ/ राजु तांबे, पो.हवा/ जर्नादन मते, पो.हवा/ अशोक पाटील,पो.हवा/ संजय नवले, पो.हवा/ मनोज तावरे, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.ना/ शंकर शिंदे, पो.ना/ विजय गायकवाड, पो.ना/ सचिन घेरे,पो.ना/ शिवाजी पाटील, पो.अं./ राकेश पवार, पो.अं/ अश्विन पाटील, पो.अं/ सुशिल पवार, सर्व नेम- गुन्हे शाखा यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.